## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

गुरुवार दिनांक १८ एप्रिल १९९६ रोजी झालेल्या मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

........

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ३६ वी बैठक गुरुवार दिनांक १८ एप्रिल १९९६ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली.

या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] | ॲडव्होकेट श्री मधु चव्हाण | सभापती |
| २] | श्री अरविंद रेळे | सदस्य |
| ३] | ,, विनोद शेपकर | ,, |
| ४] | ,, चंद्रकांत विश्वासराव | ,, |
| ५] | ,, अमोद उसपकर | ,, |
| ६] | ,, भालचंद्र ठाकूर | ,, |
| ७] | ,, दगडू सकपाळ | ,, |
| ८] | ,, प्रकाश संपत भूवड | ,, |
| ९] | ,, दिलीप गोडांबे | ,, |
| १०] | ,, गणेश तिकोणे | ,, |
| ११] | डॉ. विनोद ~~मोहन~~ मेहता | ,, |
| १२] | श्री अभय सावरकर | ,, |
| १३] | ,, अनंत पालकर | ,, |
| १४] | प्रमुख अभियंता, म.न.पा. ह्यांचे प्रतिनिधी | |

सन्माननीय सदस्य श्री देवदास साटम महत्वाच्या कामामुळे बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत.

सभेच्या सुरुवातीस मा. सभापती श्री मधु चव्हाण यांनी उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून सोबत पुढे असे प्रतिपादन केले की, श्री अशोक लाल, मुख्य अधिकारी ह्यांची लोकसभेच्या निवडणुकीच्या कामासाठी निवडणूक अधिकारी म्हणून नेमणूक झाली असून त्या संदर्भात आज ११.४५ वाजता मंत्रालयात बैठक आयोजीत करण्यात आली आहे व त्यासाठी त्याना त्या बैठकीस जाणे अगत्याचे असल्याने ते आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकणार नाहीत असे त्यांनी प्रत्यक्ष भेटीअंती सांगितले. तसेच उपस्थित अधिकारीसुध्दा निवडणुकीच्या कामात गुंतलेले

असल्यामुळे त्यांनाही लवकर जावयाचे आहे. मा. सभापती यांनी श्री गद्रे, नि. का. अ/ दु. व. पु. याना आजच्या बैठकीतील कार्यसूची संदर्भात माहिती देण्यास सांगून बैठकीस औपचारिकरित्या सुरवात करण्यात आली.

बाब क्रमांक : ३६/१

विषय- दि. १२. ३. ९६ रोजी झालेल्या ३५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

---

मंडळाच्या दि. १२. ३. ९६ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ. क्र. १ ते १४५ वर सादर करण्यात आला आहे. सदर कार्यवृत्तांतावर चर्चा करताना मा. सदस्य श्री अरविंद रेळे यांनी अशी विचारणा केली की, आपण जी प्राथमिक बृहत्सूची तयार केलेली आहे त्याची सद्यस्थिती काय आहे ?

यावर माहिती देताना सहमुख्य अधिकारी श्री झेंडे यांनी सांगितले की, जी प्राथमिक यादी जाहीर करण्यात आली आहे व त्यात ज्यांची नावे नाहीत अशांची नावे यादीत केव्हाच येउ शकणार नाहीत असे नाही, आतापर्यंत यादी प्रसिध्द केल्यानंतर मंडळाकडे हरकती/हक्कांच्या स्वरुपात सुमारे ९५० अर्ज आलेले आहेत. या व्यतिरिक्त सुरवातीची ७५० नावे आहेतच. या ९१० प्राप्त झालेल्या अर्जदारांचे हक्क तपासण्यासाठी प्राधिकरणाने ५ प्राधिकृत अधिका-यांची नेमणूक केलेली आहे. ते प्रत्येक माणसाचे हक्क तपासून त्यांना त्या त्या वर्षाची जेष्ठता देण्यात येणार आहे. आणि त्यानंतर अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. हे काम करताना २०-२५ वर्षांचा जूना रेकॉर्ड विचारात घेऊन करावयाचे असल्याने त्यास विलंब होत आहे. तसेच संबंधित अधिकारीवर्ग निवडणुकीच्या कामासाठी गेलेला असल्याने माहिती वेळेवर मिळणे अशक्य झाले आहे, त्यानी पुढे असे प्रतिपादन केले की, ~~[illegible]~~ २ी पिढ्यांबाबत मा. सभापती यांच्याबरोबर सर्व कार्यकारी अभियंता यांची दोन वेळा बैठकही घेण्यात आलेली आहे.

मा. सभापती यांनी सर्व सदस्यांना आवाहन केले की, जर कोणी त्यांच्याकडे याबाबत तक्रार घेऊन आले तर त्याची त्वरित दखल घेऊन संबंधित अधिका-यांना कळविण्यात यावे. सन १९७० ते १९७६ या सालातील जे लोक संक्रमण शिबीरात आहेत व ज्यांच्या इमारती होणार नाही असे जे लोक आहेत अशा ८९ लोकांना आपण वितरण करावे असे मत मुख्य अधिकारी यांनी व्यक्त केले होते, असे सांगून आतापर्यंत प्राप्त झालेल्या सवळजवळ ९५० अर्जापैकी जर ५० गाळेधारक जर १९७० ते १९७६ या काळातील असतील व त्यांची पात्रता सिध्द झाल्यास त्यांना गाळे देण्यात उपलब्ध असतील काय? अशी विचारणा केली. यावर मुख्य अधिकारी यांनी मंडळाकडे

जवळजवळ ३०० गाळे सध्या उपलब्ध असल्याचे सांगितले.

मा. सभापती यांनी पुढे अशीही माहिती दिली की, काही बोगस प्रकरणे निदर्शनास येऊ लागली आहेत. त्यासंबंधात आपण मतदार यादीचा उतारा व इतरही संबंधित कागदपत्रे अर्जदाराकडून मागविलेली आहेत. तसेच ज्या भाडेकरुंची नावे बृहत्सूचीत आहेत परंतु केवळ त्यांनी गाळयांत पोटभाडेकरु ठेवल्यामुळे त्यांना मंडळाची पत्रे मिळाली नाहीत अशांच्यासुध्दा तक्रारी आलेल्या आहेत. तरी अशा लोकांच्या बाबतीत काही सूचना मिळाल्या तर मा. सदस्यांनी त्या संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात याव्यात असे सुचविले.

यावर मा. सदस्य श्री गणेश तिकोणे यांनी अशी माहिती दिली की, त्यांनी २/३ भाडेकरुंची नावे घोषित यादीत नाहीत अशाचे प्रश्न घेऊन ते संबंधित मिळकत व्यवस्थापक यांना भेटले व विचारणा केली की, जे ५ प्राधिकृत अधिकारी नेमलेले आहेत त्याचे काम कधी पूर्ण होईल. तेव्हा मिळकत व्यवस्थापकांनी १५ मे १९९६ नंतर काम होईल असे सांगितले. कारण बहुतेक कर्मचारीवर्ग निवडणूक कामासाठी गेलेले आहेत. यावर मा. सदस्यांनी असे प्रतिपादन केले की, अशा विलंबा मुळे सदर यादीस अंतिम स्वरुप देण्यास विलंब लागेल.

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, सुनावणीची कामे सुरु झालेली असून जवळजवळ ४०० लोकांना आपण बोलाविले होते. परंतु त्यापैकी सुमारे २०० लोक आलेच नाहीत. व २०० लोकांच्या सुनावणीचे काम पूर्ण झालेले आहे. या अधिकाऱ्यांपैकी ज्यांना निवडणुकीचे काम असेल त्यांच्यापुरतेच हे काम राहील. बाकीच्या अधिकाऱ्यांचा निवडणुकीच्या कामाशी संबंध नाही. हे पाच प्राधिकृत अधिकारी सर्वश्री भागवत, शालू, परब्रेकर, पाटील व गोसावी असे असून यांना मा. सभापती यांनी एक व्यक्तिगत पत्रही लिहिले आहे व विनंती केली आहे की, त्यांच्याकडील कामा व्यतिरिक्त त्यांनी हे अधिक काम करावयाचे असून त्यांच्याकडे कामाचा बोजा आहे याची कल्पना आहे. परंतु एक सामाजिक दृष्टीकोन म्हणून त्यांनी हे काम लवकरात लवकर करावे.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी पृ.क्र.५९ चा उल्लेख करुन मंडळाला ज्या ५६ सदनिका मिळाल्या आहेत त्याची यादी व ज्या सदनिका रिकाम्या आहेत त्यांची यादी सादर करण्यात येईल असे सांगितले होते. त्याबद्दल काय झाले अशी विचारणा केली.

यावर मा. सभापती यांनी स्पष्ट केले की, मंडळास ५६ गाळे/सदनिका मिळाल्या असून सध्या १९ सदनिका मंडळाकडे उपलब्ध असून उर्वरित गाळयाचे वितरण करण्यात आले आहे, असे सांगून संबंधित अधिकाऱ्यांस याबाबतची यादी दोन दिवसांत सादर करण्याच्या सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, मंडाळ ज्या इमारती पुनर्रचित करते अशा इमारतींना पाण्याचे कनेक्शन देतांना महानगरपालिका काही अटी मंडळास घालते त्यापैकी एक अट अशी असते की, ४० ते ५० टक्के गाळे महानगरपालिकेस देण्यात यावेत. हे बरोबर नाही, यावर श्री. पोतदार, कार्यकारी अभियंता [महानगरपालिका] यांनी असा खुलासा केला की, अशा प्रकारची अट त्यांच्या माहिती-प्रमाणे घालत नसल्याचे सांगितले, परंतु एखाद्या प्रकरणामध्ये आरक्षण असल्यास नियमाप्रमाणे त्या इमारतीचे नकाशे मंजूर करतांना अट घालण्यात येते.

यावर मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, श्री. तिनईकर साहेब, माजी आयुक्त असतांना त्यांनी एक परिपत्रक काढले होते की, अशा प्रकारच्या मंडळाच्या जागा ताब्यात घेण्याची आवश्यकता नाही. दुरुस्ती मंडळास ३.१२२ चटईक्षेत्र निर्देशांकाची जी सवलत देण्यात आली आहे त्याचा अर्थच मूळात असा आहे की, त्या इमारतीमधील जर मूळ भाडेकरु राहिले नाहीत तर अधिक एफ. एस. आय. देण्याच्या एकूण हेतूलाच तिलांजली दिल्यासारखे होईल. मंडळ अतिरिक्त गाळे जास्त अशासाठी बांधते की, ज्यांची मूळ इमारत होणार नाही त्यांची व्यवस्था करण्यात आली त्यामुळे त्यातलेही गाळे जर महानगर-पालिकेने घेतले तर ते अन्यायकारक आहे. मा. सभापती यांनी पुढे माहिती दिली की, त्यांनी मा. आयुक्तांना एक सविस्तर पत्र या संदर्भात दिले असल्याचे सांगून सदर पत्रातील मजकूर सर्वसदस्यांना वाचून दाखविला. त्यांनी पुढे असेही प्रतिपादन केले की, सदर पत्रावर मा. आयुक्त यांनी असे मत दिले आहे की, प्रथम दर्शनी आपली विनंती योग्य वाटते. तरीही तिनईकर साहेबांचे परिपत्रक तपासून यावर योग्य तो विचार केला जाईल असे आश्वासन दिले आहे. त्यांनी पुढे असे सुचविले की, जर आपली मागणी महानगरपालिकेने मान्य केली नाही तर आपण सर्वजण मा. आयुक्तांना भेटावयास जाऊ. यास सर्व सन्माननीय सदस्यांनी सहमती दर्शविली.

मा. सभापती यांनी आज आपण हे ठराव कृपाने मंजूर करु असे सांगून ह्या विशिष्ट केसबाबत संबंधित उपमुख्य अभियंता [पुनर्र], सहमुख्य अधिकारी, कार्यकारी अभियंता यांनी एकत्रित बसून मार्ग काढावा असे सुचविले.

५/-

चर्चेच्या ओघाओघात सहमुख्य अधिकारी श्री. झेंडे यांनी असे निदर्शनास आणले की, मंडळाची त्रिशूळ इमारत पूर्ण बांधून झालेली आहे. सदर इमारती प्रश्नांबाबत विधानसभेचे विद्यमान अध्यक्ष यांनी दोन-तीन बैठकाही घेतलेल्या होत्या. सदर प्रकरणात महापालिकेने अशी भूमिका घेतली आहे की, त्रिशूळ इमारतीतील दुकाने असलेला तळ मजला त्यांना मंडळाने द्यावा. याबाबत जी मंडई आहे ती महा-नगरपालिकेस देण्याबाबत दुमत नाही कारण मंडई त्या हेतूनेच बांधण्यात आली आहे. परंतू जुन्या इमारतीच्या बाहेरच्या बाजूस जे स्टॉल्स बांधण्यात आले आहेत ते स्टॉल्स महानगरपालिका मागणी करित आहे. ते स्टॉल्स मंडळ कोणाला वितरीत करेल ते मंडळाने ठरवावे. महानगरपालिकेचे जे परवाना धारक आहेत त्यांना मंडळ सामावून घेईल तरी याबाबत धोरणात्मक निर्णय घेतांना या सर्व गोष्टीं-चा विचार करावा लागेल. तरी यापुढे अतिरिक्त गाळे नियमाच्या बाहेर एकही सदनिकां

मा. सदस्य ठाकूर, यांनी असे निदर्शनास आणले की, मागील बैठकीत ८७-९२ हुजूरिया स्ट्रीट, नागपाडा या इमारतीचे काम मार्च-९६ पर्यन्त पूर्ण होईल असे आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे पूर्ण काम झाले का ? अशी विचारणा केली. तसेच सदर पुर्नबांधणी योजनेत संबंधित कार्यकारी अभियंता श्री. जावळे यांनी मा. सदस्य श्री. ठाकूर, व श्री. सकपाळ यांची भेट आयोजित करावी असे ठरल्याचे निदर्शनास आणून याबाबत पुढे कोणती कार्यवाही झाली ? असे विचारले. यावर मा. सभापती यांनी जर इमारतीस भेट देण्याचे ठरले होते तर त्या बाबत कार्यवाही पूर्ण करण्याचे दिलेले आश्वासन पूर्ण होत नसल्याबाबत नाराजी व्यक्त केली व मा. सदस्य श्री. ठाकूर यांना तसे लेखी संबंधित श्री. जावळे, कार्यकारी अभियंता यांनी कळवावे अशा सूचना दिल्या. तसेच श्री. परब, उपमुख्य अभियंता [पुनर्र] यांनी जातीने लक्ष घालावे असे सूचित केले.

मा. सदस्य गोडांबे, यांनी निदर्शनास आणले की, त्यांनी "उल्लेंगल इमारतीबाबत तक्रार संबंधित कार्यकारी अभियंता यांना देवून त्यांनी काहीही कार्यवाही केली नाही याबाबत नाराजी व्यक्त केली. त्यांनी पुढे असेही सांगितले की, उल्लेंगल इमारतीच्या खाली सार्वजनिक मुतारीचे स्वरुप आलेले आहे. तेथे फेरीवाले, ~~भिकारी~~ भिकारी

ती जागा वापरतात. तेथे कसलीही सुरक्षा व्यवस्था नाही. वा कोणत्याही प्रकारची देखभाल केली जात नाही. यावर सदर इमारती-बाबत मा. सभापतींच्या सूचनेनुसार श्री. पालीवाल यांनी संक्षिप्त माहिती सभागृहास दिली.

मा. सदस्य श्री. ठाकूर, यांनी कार्यवृत्तांतातील पान क्र. ७३ वरील स्वातंत्र्यवीर सावरकर मार्गावरील "पितृछाया" इमारती-जवळील कचरा अजूनही तसाच जागेवर पडलेला असल्याचे सांगितले. यावर मा. सभापती संबंधित कार्यकारी अभियंता श्री. कानविंदे यांना याबाबत दोन दिवसात कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य श्री. उसपकर, यांनी असे निदर्शनास आणून दिले की, विधी शाखेच्या सहाय्यकांच्या संदर्भात त्यांनी मागील बैठकीत मुददा उपस्थित केल्याचे निदर्शनास आणून देवून त्याचा उल्लेख कार्यवृत्तांतात नसल्याचे सांगितले.

यावर मा. सभापती यांनी मा. सदस्य श्री. उसपकर यांना विधी सल्लागाराबाबत मांडलेल्या मुददयाची नोंद कार्यवृत्तांतात करण्यात येईल असे सांगितले.

वरील सविस्तर चर्चेनंतर सर्वानुमते दि. १८. ४. ९६ रोजी झालेल्या ३७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वरील नोंदी घेवून स्थायी करण्यात आला.

बाब क्रमांक - ३६. २
===============

विषय - जुनी इमारत क्र. ९ए व ९बी
वाणी चाळ, जगन्नाथ भातणकर मार्ग,
येथील पुनर्रचित इमारतींच्या नावास
मंजूरी मिळणे बाबत.
=======

विषयांकित मालमत्तेवर इमारतीस नाव देण्याचा प्रस्ताव पृ. क्र. १४७ वर सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करतांना मा. सभापतींनी सांगितले की, संबंधित अधिकाऱ्यांनी भाडे-करूंच्या सम्मतीने "मातोश्री" हे नांव सुचविलेले आहे. यावर चर्चा करतांना सन्माननीय सदस्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, मा. शिवसेना प्रमुखांच्या निवास स्थानाचे नांव "मातोश्री" असल्याने हया इमारतीस हे नांव देण्यात येवू नये. या मताशी इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी सहमती दर्शवून सदर नावात भावना जोडलेल्या आहेत असे सांगितले. यावर मा. सभापती यांनी संबंधीत कार्यकारी

अभियंता श्री. हुले, यांना इतर नावा बाबत रहिवाशांशी चर्चा करुन पुढील बैठकीत अहवाल सादर करावा अशा सूचना दिल्या.

बाब क्रमांक - ३६.३

विषय - प्राधिकरण अधिनियम १९७६ चे कलम १०३ [ब] अंतर्गत सहकारी संस्थांच्या प्रस्तावांना मंजूरी मिळणे बाबत.

उपरोक्त विषयाअंतर्गत खालील चार प्रस्ताव पृ. क्रमांक- १४९ ते २१७ वर सादर करण्यात आलेले आहेत.

१] इ. क्र. १ भागीरथी निवास ४५० -४५० अे, जे. एस. एस. रोड, ताडवाडी "सी" विभाग, मुंबई.

२] इ. क्र. ७४ "सी" विरचंद निवास" ठोकरशी जीवराज मार्ग, एफ/एस विभाग, मुंबई.

३] इ. क्र. १५ "ईश्वरदास मेन्शन" नाना चौक "डी" विभाग, गावदेवी, मुंबई.

४] इ. क्र. ३५९ "पार्वती बिल्डींग" जे. एस. एस. रोड, "बी" विभाग, मुंबई.

वरील चारही प्रस्तावांवर चर्चा करतांना मा. सभापती यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, सदर प्रस्ताव भाडेकरुंनी त्यांच्या इमारतीची स्वखर्चाने दुरुस्ती करुन इमारत सुस्थितीत ठेवण्याचा उद्देश आहे. आपल्या अधिका-यांनी प्रस्तावित इमारतींची पाहाणी केलेली असून ७० % भाडेकरुंची सदर प्रस्तावास संम्मती असल्याची खातरजमा केलेली आहे. तसेच नियोजित सहकारी संस्थेचा उद्देश समर्थनीय आहे असे मत दिलेले आहे.

यावर मा. सदस्य श्री. विश्वास राव यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, जर उर्वरीत ३० % भाडेकरुंना संस्थेचे सभासदत्व पत्करत नसतील तर अशा परिस्थितीत आपण काय करतो. यावर खुलासा करतांना श्री. हुले, कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, नियोजित संस्थेचे सभासद न होणा-या भाडेकरु/रहिवाशांना संस्था त्यांना संस्थेचे भाडेकरु म्हणूनच स्विकारतात.

८/-

वरील सविस्तर चर्चेअंती कलम १०३ [ब] अंतर्गत सहकारी संस्थांच्या चारही प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक – ३६/२७६
=====================

प्राधिकरण अधिनियम १९७६ चे कलम १०३ [ब] अंतर्गत खालील चार नियोजित सहकारी संस्थांच्या प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१] इ.क्र.१ भागिरथी निवास ४५० – ४५० जे.जे.एस. एस. रोड, ताडवाडी "सी" विभाग, मुंबई

२] इ.क्र.७४ "सी" विरचंद निवास" ठोकरशी जीवजी मार्ग, एफ / एस विभाग, मुंबई.

३] इ.क्र.१५, "ईश्वरदास मेन्शन" नावा चौक "डी" विभाग गावदेवी मुंबई.

४] इ.क्र.३५९ "पार्वती बिल्डींग-"जे.एस.एस. रोड, "बी" विभाग, मुंबई.

बाब क्र.–३६/४
============

विषय – मानखुर्द येथील संक्रमण शिबीरामध्ये नविन इमारती बांधून जागा देण्याविषयी किंवा पुनर्रचित इमारतीमध्ये गाळे देण्याविषयी विनंती.
=====

उपरोक्त विषयाची बाब टिप्पणी पृ.क्र.२१९ वर सादर करण्यात आली आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करतांना मा.सभापती यांनी असे निदर्शनास आणून दिले की, तेथील लोकांनी अशी मागणी केली आहे की, त्यांना कायमस्वरुपात जागा देण्यात यावी. तरी मंडळ त्यांना संक्रमण शिबिरातून नविन इमारतीत हालविणार कि कायम स्वरुपी जागा देणार अशी शंका उपस्थित केली. यावर संबंधित अधिकारी यांनी आहे असे सांगितले की नविन इमारतीमध्ये संक्रमण शिबिर म्हणूनच जागा देणार आहोत. ~~अशी माहिती दिली~~.

यावर मा.सभापती यांनी संबंधित अधिका-यांना असे सूचित केले की, त्यांनी संबंधित भाडेकरु/रहिवाशी यांना स्पष्ट कल्पना दयावी की, ही इमारत त्यांच्यासाठी बांधलेली नसून त्यांची इमारत जिर्ण अवस्थेत असल्यामुळे पाडीत आहोत व त्या ऐवजी नविन इमारत बांधून त्या लोकांना त्या इमारतीत पर्यायी जागा [कायमस्वरुपी नाही ] म्हणून हलविण्यात येत आहे. यास सर्व सन्माननीय सभासदांनी सहमती दर्शवून सर्वानुमते सदर प्रस्तावास मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक – ३६ / २७७

मानखुर्द येथील संक्रमण शिबीरामधये नविन इमारती बांधून तेथील रहिवाशांना पर्यायी जागा [ कायमस्वरुपी नाही ]म्हणून तेथेच उपलब्धतेनुसार देण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

बाब क्र.–३६ /५

मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी घ्यावयाचे विषय.

विषय :– मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकर प्राप्त इमारतीच्या पुर्नविकासासाठी "ना हरकत प्रमाण पत्र" प्रदान करावयाचे प्रस्ताव.

उपरोक्त विषयास अनुसरुन मा.अध्यक्षांच्या परवानगीने पुर्नविकासासाठी "ना हरकत प्रमाण पत्र" प्रदान करावयाचे खालील एकूण सहा प्रस्ताव आजच्या बैठकीत सादर करण्यात आलेले आहेत.

१] भूकर पहाणी क्र.२७८/१०, माटुंगा विभाग, भूखंड क्र.३४५, दादर, माटुंगा इस्टेट, उपकर क्र.एफएन–७४४० [१५] इमारत क्र.६ चंदावरकर मार्ग, माटुंगा [पूर्व], मुंबई येथील मालमत्तेच्या पुर्नविकासाकरिता "ना हरकत प्रमाण पत्र" प्रदान करण्याबाबत.

२] भूकर पहाणी क्र.१८१७ माहीम विभाग, भूखंड क्र.१०७, शिवाजी पार्क स्कीम इमारत क्र.१६, शिवाजी पार्क रोड क्र.३ दादर [पश्चिम] मुंबई येथील "दत्ता निवास" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाण पत्र" प्रदान करण्याबाबत.

३] भूकर पहाणी क्र. ३८४ व ३८५ परळ-शिवडी विभाग इमारत क्र. ३६ – ३८, भगवंतराव परळकर मार्ग, परळ व्हिलेज, मुंबई -१२ येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाण पत्र" प्रदान करण्याबाबत.

४] भूकर पहाणी क्र. ३९/१०, माटुंगा विभाग, भूखंड क्रमांक -२४, दादर माटुंगा इस्टेट इमारत क्र. २, व्हिन्सेन्ट स्क्वेयर स्ट्रीट उपकर क्र. एफएन-६६७० येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाण पत्र" प्रदान करण्याबाबत.

५] भूकर पहाणी क्र. ३/३९, ३९ व ११, लोअर परळ विभाग इमारत क्र. ६३, ६५ धोबीवाला स्ट्रीट आणि १०४, १०४-अे, १०४ बी क्लार्क रोड, महालक्ष्मी ग/दक्षिण विभाग, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाण पत्र" प्रदान करण्याबाबत.

६] भूकर पहाणी क्र. २०० व २/२००, माझगांव विभाग, गनपावडर रोड, ई विभाग, मुंबई ह्या दोन भूखंडाचे एकत्रिकरण [अमालगमेशन ] करुन त्यांचा संयुक्त पुनर्विकास करण्यास "ना हरकत प्रमाण पत्र" प्रदान करण्याबाबत.

वरील सहा मालमत्तांना "ना हरकत प्रमाण पत्र" प्रदान करण्याच्या प्रस्तावावर प्रदीर्घ चर्चा होऊन सर्वानुमते "ना हरकत प्रमाण पत्र" देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक – ३६/२८९

"अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी खालील सहा प्रस्तावांना "ना हरकत प्रमाण पत्र" प्रदान करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

१] भूकर पहाणी क्र. २७८ /१०, माटुंगा विभाग, भूखंड क्र. ३४५, दादर माटुंगा इस्टेट उपकर क्र. एफएन-४४४० [१५] इमारत क्र. ६ चंदावरकर मार्ग, माटुंगा [पूर्व] मुंबई.

२] भूकर पहाणी क्र. १८१७ माहीम विभाग, भूखंड क्र. १०७ शिवाजी पार्क स्कीम इमारत क्र. १६ शिवाजी पार्क रोड क्र. ३ "दत्ता निवास" दादर [पश्चिम] मुंबई.

३] भूकर पहाणी क्र. ३८४ व ३८५ परळ-शिवडी विभाग इमारत क्रमांक – ३६ – ३८, भगवंतराव परळकर मार्ग, परळ व्हिलेज, मुंबई –१२

४] भूकर पहाणी क्र. ३९/१०, माटुंगा विभाग, भूखंड क्रमांक २४, दादर माटुंगा इस्टेट, इ.क्र. २ व्हिन्सेन्ट स्क्वेयर स्ट्रीट, उपकर क्र. एफएन-६६७०

५] भूकर पहाणी क्र. ३/३९, ३९ व ११४, लोअर परळ विभाग इमारत क्र. ६३, ६५ धोबीवाला स्ट्रीट आणि १०४, १०४-ऐ, १०४ बी क्लार्क रोड, महालक्ष्मी ग/दक्षिण विभाग, मुंबई.

६] भूकर पहाणी क्र. ३०० व २/३००, माझगांव विभाग, गन पावडर रोड, ई-विभाग, मुंबई ह्या दोन भूखंडाचे एकत्रिकरण [अमलगमेशन]

---

तदनंतर मा. सभापती यांनी सर्व सन्माननीय सदस्यांना अध्यक्षांच्या परवानगीने त्यांचे विषय मांडण्यास परवानगी दिली.

तदनुसार दुरुस्ती मंडळाच्या देखभालीच्या विषयाबाबत बोलतांना मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी असे सांगितले की, मागील बैठकीत मंडळास भाडे वाढ करावी लागेल असे मुख्य अधिकारी यांनी ~~मागील बैठकीत~~ सूचविले होते. जर भाडेवाढ करावयाची असेल तर रहिवाशांना आपण काय सुविधा देत आहोत हेही पहावयास पाहिजे. कोणतीही तक्रार केल्यानंतर देखभाल विभागाकडून ताबडतोबीने कार्यवाही झाली आहे असे क्वचित होत नाही, तरी आपला देखभाल विभाग अत्यंत कार्यक्षम होणे गरजेचे आहे असे मत दिले.

मा. सदस्य श्री. गोडांबे, यांनी असे निदर्शनास आणले की, आपल्या अभियंत्यांना न्यायालयात जावे लागते. परंतु आपला वकील वर्ग जो नियुक्त करण्यात आला आहे, त्यांना कोर्टकेसची काळजी नसते असे वाटते. म्हणून आपल्या वकीलांच्या पॅनल बाबत काही विचार / त्यात काही सुधारणा करता येईल का ? असे मत व्यक्त केले.

~~यानंतर मा. सभापतींनी संबंधित अधिकाऱ्यांना सर्व सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांची नोंद घेऊन त्याबाबत त्या त्या सन्मा. सदस्यांना कळविण्यात यावे अशा सूचना दिल्या.~~

वरिष्ठ उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत संबंधित विधी सल्लागार, /प्र. श्री. वाचासुंदरम् यांनी माहिती देतांना सांगितले की, श्री. पालीवाल यांचेविरुध्द तीन केसेस् कंन्टेम्प्टच्या आहेत. अशा कंटेम्प्टच्या केस मध्ये त्यांनी व्यक्तीशः हजर रहाणे जरुरीचे असते यावर सन्मा. सदस्यांनी कंन्टेम्प्ट कशासाठी आहे अशी विचारणा केली. त्यावर माहिती देताना श्री. वाचासुंदरम् यांनी सांगितले की, मंडळाच्या पुनर्रचित त्रिशूळ इमारती समोरील रस्तारुंदीकरणासाठी जुने बांधकाम पाडले. तेव्हा एक भाडेकरु न्यायालयात गेला व त्याने स्टेटस् - को आणला. व स्टेटस् - को असतांना देखिल सदर बांधकाम पाडले म्हणून त्यांच्या विरुध्द कन्टेम्प्ट आहे.

मा. सदस्य श्री. उतपकर यांनी देखभाल विषयाबाबत बोलतांना सांगितले की, मंडळाच्या पुनर्रचित इमारतीमध्ये झाडूवाला नियमित जात नाही. याबाबत भाडेकरुंच्या तक्रारी त्यांचेकडे येतात. तसेच पंप ऑपरेटर, [illegible] न मिळाल्यामुळे पुरेशी साफसफाई होत नाही असे वाटते. तरी याबाबत गंभीरपणे विचार करुन लोकांच्या आरोग्याशी [illegible] नये. जमल्यास मानधन वाढवून देण्यात यावे. [illegible]

यावर मा. सभापती यांनी याबाबतचा प्रस्ताव मागिल बैठकीत मंजूर करण्यात आला असून तो प्राधिकरणाकडे माहितीसाठी पाठविण्यात आला आहे. व प्राधिकरणाच्या मंजूरी नंतर त्याची अंमलबजावणी करण्यात येईल अशी माहिती दिली.

मा. सदस्य गोडांबे यांनी असे निदर्शनास आणून दिले की, "उल्लेंगल" इमारती बाबत त्यांनी एक पत्र दिलेले असून त्यात अशी सूचना केली आहे की, इमारतीस संरक्षक भिंत तसेच गच्चीवरती कठडे हे तरी काम मंडळाने करावे. तसेच इमारतींच्या भाडेकरुंनीही पत्र दिले आहे की, फेरीवाले तेथील टाळी तोडतात. म्हणून एक छोटासा दरवाजा करुन देण्यात यावा. परंतु याबाबत मंडळाच्या संबंधित पुनर्रचना विभागाकडून काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही किंवा तसे कळविले नाही.

यावर मा. सभापती यांनी श्री. पालीवाल यांना अशी सूचना केली की, त्यांनी सन्माननीय सदस्यांसह रहिवाशां बरोबर एक संयुक्त बैठक घ्यावी व यातून मार्ग काढावा.

मा. सदस्य श्री. प्रकाश भुवड यांनी नाराजीने असे मत व्यक्त केले की, मागील चार बैठकीमध्ये ते पाण्याचा प्रश्न कळकळीने मांडत आहेत. मुंबई बेटावरील संक्रमण शिबिरातील पाण्याच्या प्रश्नांबाबत महापालिका अधिकारी व आपले अभियंत्यांची एक बैठक घेण्याचे ठरले होते. परंतु पुढे काय कार्यवाही झाली याबाबत अद्याप काहीही कळलेले नाही. आजही कुलाबा संक्रमण शिबीरात पाणी आलेले नाही. लोक पाण्याच्या प्रश्नावर रस्त्यावर आलेले आहेत. लोकांनी जर अधिका-यांना बैठीत धरले व काम करु दिले नाही तर त्याची जबाबदारी आपण घेऊ शकत नाही. वेळ पडल्यास मंडळाच्या पुढील बैठकीतऊ सर्व रहिवाशांना घेवून येण्याचा प्रयत्न मी करीन. त्यांनी माहिती देतांना पुढे सांगितले की, सन १९८८ साली एक ॲडीशनल पाण्याची लाईन महापालिकेने मंजूर केली होती. परंतु निवासी वापर परवाना मंडळाने सादर केला नसल्याने पुढे काही कार्यवाही झाली नाही. आणि यामध्ये मार्ग काही निघत नाही. आणि रहिवाशी नाहक भरडला जात आहे. आणि हा ज्वलंत प्रश्न असूनही कोणी त्याची दखल घेत नाही. त्यांनी पुढे अशी माहिती दिली की, सेंट्रल रोडच्या कॉंक्रीटीकरणाचे काम तेथे चालू असून ते काम आपण थांबवून ठेवले आहे. जर पाण्याची लाईन मंजूर झालेली असेल तर ताबडतोब कार्यवाही व्हावी. यावर मा. सभापतींनी संबंधित "अ" विभागाचे अधिकारी श्री. लाहोरी यांना याबाबत योग्यतो खुलासा करण्यास सांगितले तदनुसार श्री. लाहोरी यांनी योग्य ती माहिती सभागृहात दिली, परंतु सदर माहितीने माननीय सदस्यांचे समाधान झाले नाही. मा. सदस्य श्री. भुवड, यांनी याबाबत असे निदर्शनास आणून दिले की, सन-१९८५ पासून संक्रमण शिबीरात रहात आहेत. त्यावेळी २४ तास पाणी पुरवठा होत असे परंतु आता मात्र पाणी १५ मिनिटेसुध्दा येत नाही. तरी याबाबत महानगरपालिकेकडे वरील पातळीवर पाणीपुरवठा एवढा कमी झालेला आहे त्यावर मार्ग काढण्यात यावा जेणेकरुन संक्रमण शिबीरात रहाणा-या भाडेकरुंना पुरेसे पाणी मिळेल.

मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी असे मत मांडले की, मंडळाने पुनर्रचित केलेल्या इमारतींना मीटर कनेक्शन आहे. महानगर पालिका मंडळाला पाणी विनामूल्य देत नाही, तर मीटर प्रमाणे मंडळाकडून पैसे घेते. जर पाणी कपात असेल तर महानगरपालिकेने पैसे देखील तेवढे कमी घ्यावयास पाहिजे.

यावर कार्यकारी अभियंता श्री. हुले यांनी माहिती दिली की, पाण्याचे बील हे मीटर प्रमाणे न येता ते ॲडहॉक बेसीसवर काढले जाते. याबाबत महानगरपालिकेला मीटर रिडिंग कळविण्याबाबत सांगितले आहे, परंतु या विषयाबाबत वाद निर्माण झाले होते. दुसरी गोष्ट अशी की, महानगरपालिकेस मंडळाने दाखवून दिले आहे की, पाणी कपात का होते ? त्यावर नगीदाखल त्यांनी सांगितले की, पूर्वी पश्चिम विभागात पाणीपुरवठा भरपूर होता परंतु तेथील नविन निर्माण झालेल्या झोपडपट्टीमध्ये काही कनेक्शन जमिन पातळीवर दिलेली आहेत. तसेच काही ठिकाणी नळ उघडे असतात व त्यातून पाणी वाहत असते. काही ठिकाणी लोक नळ उघडे ठेऊन आपली कामे करीत असतात. त्यामुळे पाण्याचा दाबावर परिणाम होऊन मंडळाच्या इमारतीच्या टाक्यांना पाणी कमी दाबाने मिळते.

मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी अशी माहिती दिली की, डॉ. एस. एस. राव रोडवरील कल्पतरु या मंडळाच्या इमारतीत पाणी अतिशय कमी मिळत आहे. महानगरपालिका नियमाप्रमाणे कनेक्शन देतांना प्रत्येक घरामध्ये ५ लोकांना किती पाणी लागेल या हिशोबाने पाणी देते. म्हणून जर १० वर्षापूर्वीचा जो पाण्याचा प्रेशर आहे तो कमी झाला असेल तर महानगरपालिकेने ॲडिशनल कनेक्शन देण्यात यावे आणि त्याला आणि पुर्वी दिलेल्या कनेक्शनला एकच मीटर बसविण्यात यावे. जेणेकरुन त्या मीटरमधून जेवढा पाणीपुरवठा होईल तेवढेच पैसे महापालिकेस भरता येतील. तरी भाडेकरुना पुरेसा पाणीपुरवठा होण्याबाबत वरिष्ठ पातळीवर कार्यवाही करावी अशी विनंती त्यांनी मा. सभापतींना केली.

वरील चर्चेनंतर मा. सभापती यांनी अशा सूचना केल्या की सर्वश्री. परब, जावळे, हुले, पालीवाल यांनी मंडळाच्या पुनर्रचित इमारतींना महानगरपालिकेकडून होणा-या पाणीपुरवठयाच्या विषयाबाबत एक टिपणी ताबडतोब तयार करुन देण्यात यावी म्हणजे मा. सभापती, मुख्य अधिकारी व सहमुख्य अधिकारी हे महानगरपालिका आयुक्त यांची भेट घेऊन त्याबाबत निर्णय घेतील, यास सर्व सन्माननीय सदस्यांनी सहमती दर्शविली.

मा. सदस्य, श्री. प्रकाश भूवड यांनी असे निदर्शनास आणले की, जेव्हा महानगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांजवळ तक्रार केल्यानंतर ते जेव्हा जागेवर पहाणी करावयास येतात तेव्हा मात्र पाणी बरोबर येते हे कसे ? यावर मा. सदस्य, दगडू सकपाळ यांनी महानगरपालिकेने मंडळाला कनेक्शन देतांना अटी शिथील कराव्यात असे मत मांडले.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी असे लक्षात आणून दिले की, मंडळाचे अधिकारी म्हणतात की, ४ लाख लीटरची पाण्याची आवश्यकता असतांना केवळ १ लाख लीटर पाणी उपलब्ध आहे. याचाच अर्थ ७५ टक्के कपात असून २५ टक्के पाणी फक्त उपलब्ध आहे. म्हणजे महानगरपालिकेने ७५ टक्के पाणी कपात केली आहे काय ? अशी विचारणा केली.

यावर मा. सभापती यांनी असे आश्वासन दिले की, आजची बैठक संपल्यानंतर लगेच "अ" विभागापुरते आपण चर्चा करु व मार्ग काढू. तसेच देखभाल विभागाबाबत बोलतांना मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, देखभाल विभागाबाबत आपल्याकडे अनेक तक्रारी येत आहेत. तरी श्री. परब यांनी १/२ दिवसांत संबंधित अधिका-यांची बैठक घ्यावी व याबाबत ठोस कार्यवाही करावी अशी सूचना दिल्यात.

मा. सदस्य श्री. उसपकर, यांनी पृ.क्र. ७१ वरील विषयाबाबत बोलतांना भाडेकरूंच्या नातेवाईकांनी ठेकेदारास मारहाण केलेली होती त्या संदर्भात पुढे काय कारवाई झाली तसेच एका अभियंत्याला एक ठेकेदाराने कार्यालयात मारहाण केली होती त्या संबंधात काय कारवाई झाली ? अशी विचारणा केली.

यावर मा. सभापती यांनी संबंधित अधिका-यांना अशा सूचना दिल्या की, जर त्यांनी लेखी माफी मागितली नाही तर पोलिसात तक्रार करण्यात यावी अशा निर्णय घेण्यात येत आहे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मा. सदस्यांना देण्यात यावी.

मा. सदस्य श्री. उसपकर, यांनी माहिती दिली की, मागील बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार गिरगांव येथील कामत चाळीत त्यांनी सर्वश्री. भुवड, ठाकूर यांच्यासह भेट दिली असून, भेटीचा लेखी रिपोर्टही आणलेला आहे. त्यांनी पुढे असेही अवगत करुन दिले की, सदर इमारतीच्या पुनर्रचनेसाठी मराठा को. ऑ. बँक. ही त्यांना अर्थ-सहाय्य करणार आहे. भाडेकरु पर्यायी जागेची जबाबदारी व्यक्तीगत-पणे घेणार असून, मंडळावर त्याचा बोजा पडणार नाही. तरी त्यांना "ना हरकत प्रमाण पत्र" देण्यास हरकत नाही असे मत दिले.

यावर मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, कामत चाळीचा अहवाल सादर करावा म्हणजे पुढील बैठकीत त्यावर निर्णय घेण्यात येईल.

मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी सांगितले की, चिंचपोकळी स्टेशनच्या बाजूला शिंदे आश्रम नावाची इमारत असून त्या इमारती-तील २२ लोकांचा प्रश्न आहे. या २२ लोकांना त्यांची इमारत उशिरा बनणार असेल तर बाजूच्या इमारतीत त्यांना सामावून घेण्यात यावे अशी मागणी केली.

याविषयाबाबत श्री. हुले, कार्यकारी अभियंता यांनी माहिती देतांना सांगितले की, दादर स्थापत्य वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक करण्यात आलेली आहे व पुढील काम लवकरात लवकर हाती घेण्यात येईल.

मा. सदस्य श्री. उसपकर, यांनी चिखलवाडीतील इमारतीमधील भाडेकरुंकडून मंडळामार्फत मा. सभापती यांनी जातीने लक्ष घालून मासिक भाडे द्यावयास लावले याबद्दल आभार मानले. तरीही तेथील सात इमारतींचे भाडे घेण्यात आले. परंतु पाच इमारतींचे भाडे अजून घेण्यात आलेले नाही. याविषयाबाबत मा. सभापती यांनी श्री. राव, उपमुख्य अभियंता यांना श्री. उसपकर यांची भेट घेऊन त्यांचेशी चर्चा करण्याबाबत सूचविले.

१७
१८ /-

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, मंडळाकडून एखाद्या इमारतीचे ९३ [५] अंतर्गत संपादन झाल्यानंतर त्या इमारतीतीलअनेक रहिवाशी भाडे भरावयास तयार असूनही मिळकत व्यवस्थापन शाखेकडून भाडे घेतले जात नाही. यावर मा. सभापती यांनी श्री. मोरे, उपमुख्य अधिकारी [ सं.गा. ] यांना मा. सदस्यांच्या प्रश्न समजावून घेवून त्यांची चर्चा करावी व अडचण दूर करावी. असे सांगितले.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, ठेकेदारासाठी जी काम पूर्ण करण्याची कालमर्यादा ठरविलेली आहे. त्याप्रमाणे फॉलो - अप व्यवस्थित होत नाही. त्यांच्या माहिती-साठी ४०७ - ४०७ बी काळबादेवी या इमारतीचे काम ३०.१.९५ ला पूर्ण झाले पाहिजे होते. परंतु आजपर्यन्त पूर्ण झालेले नाही. या वर मा. सभापती यांनी श्री. पाटकर, कार्यकारी अभियंता यांना सूचना दिल्या की, सदस्यांच्या तक्रारी बाबत लेखी पत्र द्यावे म्हणजे सदस्यांना/रहिवाशांना सांगणे सोपे जाईल.

मा. सदस्य श्री. अनंत पालकर यांनी असे निदर्शनास आणले की, १-३ खेतवाडी १३ वी गल्ली, या इमारतीचे दुरुस्ती काम चिंकी कन्स्ट्रक्शन मार्फत चालू आहे. येथील रहिवाशांची काम व्यवस्थीत होत नसल्याबाबत तक्रार आहे. म्हणून श्री. गवडा, साहेबांशी संपर्क साधला परंतु निवडणूकीच्या कामात व्यस्त असल्यामुळे त्याच्याशी संपर्क होवू शकला नाही. श्री. शेट्टी, उप अभियंता यांच्याबरोबर त्या इमारतीस भेट दिली असता दुरुस्ती चालू असतांना सुध्दा कामाची माहिती दर्शविणारा फलक इमारतीवर नव्हता. तो इमारतीच्या गच्चीवर नेऊन टाकण्यात आला होता. तसेच व्हिजीट बुकावरुन संबंधित वास्तुशास्त्रज्ञाने १-२ महिन्यात भेटही दिलेली नव्हती असे दिसून आले. तसेच संबंधित ठेकेदार म्हणतो की, मंडळाचे सदस्य आले तर काय झाले ? निवडणूक जवळ आलेली असल्याने ते इमारतीच्या पहाणी करण्यास येणारच अशी माहिती देवून संबंधित ठेकेदारावर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी केली. यावर मा. सभापती यांनी मा. सदस्य श्री. अनंत पालकर, यांना सूचना केली की, याबाबत लेखी स्वरुपात तक्रार उपमुख्य अभियंता श्री. राव यांना देण्यात यावी म्हणजे त्या ठेकेदारावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

मा. सदस्य खोपकर, यांनी असे मत मांडले की, आपण ज्या कामाच्या निविदा उघडतो त्याबाबत सदस्यांना विश्वासात घेण्यात येते किंवा नाही त्यांनी अशी माहिती दिली की, निविदा सोबत जी कागदपत्रे जोडलेली असतात ती चोरीला गेली असूनउसुद्धा निविदा उघडली जाते. तरीही गंभीर बाब आहे. यावर मा. सभापतींनी अशा सूचना दिल्या की, मा. सदस्यांनी मुख्य अधिकारी यांचे नांवे एक पत्र दयावे. व त्याची प्रत मा. सभापती यांना दयावी जेणेकरून याबाबत योग्य ती कार्यवाही करता येईल.

मा. सदस्य उसपकर यांनी मिळकत व्यवस्थापन विभाग मा. सदस्यांचा योग्य तो आदर ठेवत नाही. असे मत मांडून तक्रार केली की, तेथील भाडेवसुलीकार अरेरावी करतात. यावर मा. सभापती यांनी श्री. झेंडे, सहमुख्य अधिकारी यांना या प्रकरणी लक्ष घालण्याच्या सूचना केल्या.

मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी मिळकत व्यवस्थापक श्री. तेरदाळकर यांच्या कामाची पध्दत चांगली असून ते प्रशंसेस पात्र असल्याचे सांगितले. यास मा. सभापतींनीही सहमती दर्शविली.

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी सर्व सदस्यांनी चांगली चर्चा घडवून चांगले निर्णय घेतलेले आहेत. तरी संबंधित अधिकारी वर्गांनी सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयावर/सूचनांवर, सूचनांची योग्य ती नोंद घेवून कार्यवाही करावी व तसे सन्मा-सदस्यांना कळवावे अशी विनंती केली व उपस्थित सर्व सन्माननीय सभासदांचे व अधिकाऱ्यांचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहिर केले.

सही/-
निकाअ/५२५

अग्रवाल २२.५.१९९६
मुख्य अधिकारी
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई.

[signature]
मा. सभापती
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई.

२६५८ २०/५/९६